**अत्यंत महत्वाचे**

जा.क्र शिक्षण/माध्य/वशि-१३ / ५५३ /१७
शिक्षण विभाग (माध्यमिक)जि.प.कोल्हापूर
दिनांक : - १८/०४/२०१७

प्रति
प्राचार्य/मुख्याध्यापक
माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय --------------- (सर्व)
जिल्हा-कोल्हापूर

विषय :- **एपीडरमोलिसिस बुलोसा (Epidermolysis Bullosa)** पुरेशी त्वचा विकसित न होणे या आजाराने ग्रस्त असलेल्या बालकांना प्राधान्याने प्रवेश व शाळेत घ्यावयाच्या काळजीबाबत मार्गदर्शक सुचना

संदर्भ :- मा.उपसचिव,महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रं.संकीर्ण-२०१७/१४-१७/एस.डी.६/ दि.२५ जानेवारी २०१७ चे पत्र.

उपरोक्त संदर्भातील विषयान्वये बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ (RTE Act-२००९) अंतर्गत बालक यांचा अर्थ ६ ते १४ वर्ष वयोगट व विशेष गरजा असणा-या बालकांसाठी १८ वर्षापर्यंत आहे. या अधिनियमातील प्रकरण २ भाग ३(२) नुसार नमुद असलेल्या अपंग व्यक्ती अधिनियम (समान संधी हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) १९९५ अन्वये प्रकरण क्रमांक ५ मधील कलम क्रमांक २६ (अ) नुसार प्रत्येक विशेष गरजा असणा-या बालकांना नजिकच्या सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमांच्या मान्यता प्राप्त शाळांमध्ये वयाच्या १८ वर्षापर्यंत सुयोग व संचारमुक्त वातारणात प्राथमिक,उच्च प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण पूर्ण करण्यासाठी नियमित शाळेत प्रवेश व त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे बंधणकारक आहे. सदर बालकांमध्ये अंशतः अंध,श्रवणदोष,अस्थिव्यंग,मतिमंदत्व,मानसिक आजार,बधिरांधं,मस्तिष्क पक्षघात,स्वमग्न,तीव्र बहुविकलांग,इत्यादी बालकांचा समावेश आहे.

RTE Act-२००९ अधिनियमाची निर्मिती करतेवेळी प्रामुख्याने विशेष गरजा असणा-या बालकांचा शिक्षणाबाबत विचार करण्यात आला आहे. विशेष गरजा असणारी बालके ही इतर बालकांपासून वेगळे ठेवलले जाणार नाही, अथवा त्यांचे वर्ग इतर बाललकांसाठी भरविण्यात येणा-या वर्गाच्या ठिकाणापेक्षा व वेळेपेक्षा वेगळया ठिकाणी व वेळी भरविण्यात येणार नाहीत, त्यांच्यामध्ये भेदभाव होवू नये त्यांना सापत्नभावाची वागणूक दिली जाणार नाही.त्यामुळे सदर बालकांचा दुर्बल व वंचित घटकातील बालके यात समावेश करुन महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २०११ मधील भाग चार मधिल कलम ७ मध्ये नमूद करण्यात आले आहे.

वरील विशेष गरजा असणारी बालके शालेय शिक्षण घेताना अडचणीत असतात त्याचप्रमाणे **एपीडरमोलिसिस बुलोसा (Epidermolysis Bullosa)** पुरेशी त्वचा विकसित न झाल्याने त्वचा कमकुवत राहणे व घर्षणाने त्या भागात फोड येणे,परिणामी स्नायू कमकुवत होतात. परिणामी अध्यापनाच्यावेळी,शालेय परिसरात हालचाली करण्यास,बसण्यास,लिखाण,जेवण करण्यास,बॅक हाताळताना,शाळेत ये-जा करण्यास अडचण निर्माण होतात. जगभराच्या संशोधनात सदर विद्यार्थी दरलाख मुलामागे ५ ते ६ बालके आढळून येतात. त्याआनुषंगाने,ज्याप्रमाणे विशेष गरजा असणा-या अस्थिव्यंग,बहुविकलांग किंवा मस्तिष्क पक्षघात असणा-या विद्यार्थ्यांना स्नायू,हाडे व सांध्यांतर्गत दोष असतात परिणामी अध्यापनात अडचणी येतात. याच धर्तीवर **एपीडरमोलिसिस बुलोसा (Epidermolysis Bullosa)** या प्रकारात आढळून आलेल्या विशेष गरजा असणा-या बालकांना पुढील प्रमाणे शैक्षणिक व सहाय्यभूत सुविधा देण्यात याव्यात.

१. प्राधान्याने प्रवेश देण्यात यावा.
२. शैक्षणिक संसाधन कक्षाची व्यवस्था करणे
३. उपलब्ध थेरेपी/डे केअर सेंटरमध्ये पूर्व कोशल्य विकसित करणे

४. आवश्यकतेनुसार साहित्य,साधने व उपकरणे उपलब्ध करुन देणे
५. रॅम्प्स,हॅडड्रील्ससह अडथळा विरहित परिसर व अडथळया विरहित वर्गात बसण्याची व्यवस्था करावी
६. मदतनीस म्हणून पालकांचे सहकार्य घ्यावे
७. वर्गात समायोजन होईपर्यत सदर पालक विद्यार्थ्यासोबत शाळेत उपस्थित राहण्यास परवानगी देणे
८. सदर विद्यार्थ्यांना शाळा सुटण्या अगोदर १० मिनिटे आधी सोडण्यात यावे
९. अनुकूलित पाठयपुस्तके,ऑडिओ सीडीज स्वयंअध्यनाच्या दृष्टीने उपलब्ध करुन देणे
१०. प्रथमोपचार पेटी उपलब्ध करुन ठेवणे
११. सदर बालकांच्या वेद्यकिय उपचाराबाबतचे दस्ताऐवज उपलब्ध करुन घेणे
१२. आवश्यकतेनुसार शैक्षणिक सहाय्यासाठी विशेष शिक्षकांची मदत देणे

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सवलतीबाबतचे शासन निर्णय दिनांक ८ जानेवारी २०१६ व शासन परिपत्रक दिनांक १५ फेबुवारी २०१६ मधील तरतुदीनुसार विशेष गरजा असणारे विद्यार्थी म्हणून सदर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा व अडचणी ओळखून शैक्षणिक सवलती देण्यात याव्यात.

तरी जिल्हयातील सर्व शाळांना सुचित करणेत येते की, संदर्भानुसार दिलेल्या वरिल प्रमाणे सुचनांची काटेकोरपणे अमंलबजावणी करणेची आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद कोल्हापूर

**प्रत, माहितीसाठी व कार्यवाहीसाठी**

१. उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जि.प.कोल्हापूर
२. विस्तार अधिकारी (शिक्षण) शिक्षण विभाग (माध्यमिक) जि.प.कोल्हापूर

२/- आपण शाळा भेटीच्या वेळी प्राधान्याने वरील सुचनाप्रमाणे अंमलबजावणी होते की नाही याबाबत प्राधान्याने तपासणी करणेची आहे. तसेच याबाबत आपणही आपले स्तरावर सुचना वेळोवेळी सुचना देणेच्या आहेत.